# ग्रामीण समुदाय आणि पंचायत राज संस्थांच्या भुमिका

**प्रा. डॉ. किशोर भारत कुडे**
फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली
मो. नं. : 9370322318, 8275553480
ई-मेल : gorijikude@gmail.com

---

**प्रस्तावना :**

समुदायात व्यक्ती आपले संपुर्ण जीवन जगताना उद्देशपुर्ती महत्वाची असते. सर्व प्रकारच्या उद्देशपुर्तीसाठी समुदाय आत्मनिर्भर असतो. म्हणुन एका समुदायात राहणाऱ्या लोकांची जीवन पध्दती सारखी असते. समुदायातील सर्व लोक एक दुसऱ्याच्या सानिध्यात राहत असल्याने त्यांच्यात आम्ही ही भावना असते. समुदायात अनेक व्यक्ती गट एकत्रित आल्याने त्यांचे परस्परावलंबीत्व भावना होत असते. म्हणुनच कोणताही कलह सोडविण्यासाची जबाबदारी सामाजिक संस्था घेताना दिसतात. समुदायातील व्यवस्थेचा प्रत्येकावर परिणाम होतो. म्हणुनच समुदाय मोठ्या समाजाचे प्रतिबींब असे म्हटल्या जाते. भारतात ग्रामीण समाजाच्या विकासावर जास्त भर देण्यात येत आहे. भारताच्या सर्वांगीण विकासाकरीता ग्रामीण विकास आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपल्याला ग्रामीण वैशिष्ट्ये लक्षात घेणे आवश्यक आहे. आज ग्रामीण भागात परिवर्तन घडुन आलेले आहे. तरीसुध्दा परंपरांच्या जाळ्यात जीवन पध्दती अडकलेलीच आहे. ग्रामीण समाजाचा अभ्यास करताना ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये लक्षत घेणे आवश्यक आहे.

**ग्रामीण समुदायाचा अर्थ :**

समुदाय व्यक्तीचा समुह आहे जो लहान क्षेत्रात राहतो आणि सामान्य जीवन व्यतीत करतो. समुदाय हा सर्वात लहान असा स्थानिक समुह आहे की, ज्यामध्ये सामाजिक जीवनाचे सर्व पैलु दिसुन येतात. एक मानवी लोकसंख्या जी एक निश्चित भौगोलीक क्षेत्रात निवास करते आणि सामान्य अथवा एक दुसऱ्यावर आश्रित जीवन व्यतीत करतो. सामाजिक जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारा लहानात लहान असा एकाच भुप्रदेशात राहणारा गट म्हणजे समुदाय होय.

वरील अर्थावरुन ग्रामीण समुदाय या निसर्गावर अवलंबुन असते. सामाजिक संबंधामध्ये घनिष्ठता असते. लहान आकार असतो. सामान्य जीवन जगतात अशा लोकांचा समुह म्हणजे "ग्रामीण समुदाय" असे आपणास म्हणता येईल.

**ग्रामीण समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये :**

ग्रामीण समाजाची वैशिष्ट्ये बघताना असे लक्षात येते की, रुढी, परंपरा, सांस्कृती, शेती, शिक्षणाचा अभाव, साधे जीवन, परस्परांबद्दल आपुलकी, एकत्र कुटूंब पध्दती दिसुन येते. तरी आधुनिक काळात नागरी संपर्कामुळे

किंवा आधुनिकीकरणामुळे ग्रामीण समाजसुध्दा बदलत आहे.

**सामाजिक परिवर्तन :**

ग्रामीण भारतामध्ये सातत्याने परिवर्तन घडुन येत आहे. ही परिवर्तनाची प्रक्रिया मंद असली तरी तिचा प्रभाव ग्रामीण सांस्कृतीवर मात्र झपाट्याने परिवर्तन होत असल्याचे दिसुन येत आहे. ग्रामीण भारतात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतीक, धार्मिक, नैतीक मुल्ये या सर्व घटकामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे बदल होत आहे. ग्रामीण समाजात अध्ययन करीत असताना या सर्व बाबी त्यांच्यात होणारे बदल व त्याचा समाजावर होणारा परिणाम पाहणे महत्वाचे ठरते.

१. ग्रामीण धर्म : सध्याच्या सामाजिक परिस्थितीत मात्र धर्माचे स्वतंत्र बदल आहे. पुजापाठ, विधी, जादुटोणा, भुतप्रेत, पौराणित कथा इ.

२. जातिव्यवस्था : आजपर्यात काही जाती कनिष्ठ काही वरिष्ठ मानल्या जात होत्या. तसेच व्यवसाय ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात परिवर्तन होण जास्त आहे. परंतु हळुहळु ग्रामीण व्यवस्थासुध्दा बदलत आहे.

३. कुटूंब : ग्रामीण समाजामध्ये संयुक्त कुटूंब पध्दती प्रचलीत होती. पितृसत्ता होती. व्यवसाय, परंपरागत चालतवीत होते. परंतु शहरीकरणाच्या सानिध्यात आल्यामुळे कुटूंब व्यवस्थेत परिवर्तन होत आहे.

४. विवाह : मानवी समाजाच्या लैंगीक संबंधांना नियमीत करण्यासाठी प्रत्येक समाजात विवाह व्यवस्था असते.

५. व्यवसाय : भारतात वेगवेगळ्या राज्यातील वेगवेगळे हवामान असल्याने त्याप्रकारे शेती केली जाते. तसेच जाती आधारीत व्यवसाय केला जातो. परंतु शैक्षणिक प्रगती, नागरीकीकरण व शहरीकरणामुळे यात बदल दिसुन येतो.

६. राहणीमान व पोषाख : पुर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण आणि मध्य अशा पाच विभागामध्ये भारत विभागला गेला आहे. प्रत्येक भागात हवामान वातावरण वेगळा आहे. सण समारंभ, उत्सव, भाषा, खाण्याच्या सवयी, व्यवसाय वेगवेगळे आहेत. परंतु शहरीकरण, शिक्षण, पाश्चात सांस्कृतीमुळे परिणाम ग्रामीण भागावर पडत आहे.

७. सण-समारंभ, रुढी, परंपरा : सण-समारंभ, रुढी, परंपरा यामुळे सामाजिकरण होतात व मुल्य टिकुन राहते. परंतु शहरीकरणामुळे व आर्थिक कमतरतेमुळे तसेच शैक्षणिक प्रगतीमुळे रोजगाराच्या संधीमुळे यात बदल होताना दिसुन येत आहे.

८. मनोरंजन : पुर्वी मनोरंजनासाठी शर्यती, लोकनृत्य, दंडार, किर्तन, भजन परंतु आज भौतिक साधनाच्या विकासामुळे यात बदल झालेला आहे. परंतु आज टि.व्ही., रेडीयो, मोबाईल इ. माध्यमांनी मनोरंजनाच्या जागा घेतल्या आहे.

९. ग्रामीण शिक्षण : मानव काही गोष्टी जुन्या पिढीकडुन शिकत असतो. काही बाबी प्रत्येक पीढीकडुन शिकत असतो किंवा हस्तांतरण होते. परंतु आज शैक्षणिक संधी आणि सोयी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामीण शिक्षणात परिवर्तन होत आहे.

**दारिद्र्य निर्मुलनाचे उपाय :**

भारत सरकारणे विविध पंचावार्षिक योजना अंतर्गत अनेक विकास व रोजगार कार्यक्रम सुरु केले आहेत.

Research Hub International Journal

आर्थिक उत्पन्न देणारे कार्यक्रम, प्रधानमंत्री रोजगार योजना, महिला समृध्दी योजना, जवाहर समृध्दी योजना, संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना, स्वर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना, अन्नपुर्णा योजना, अंत्योदय अन्न योजना, कामाच्या बदल्यात अन्नधान्य, जयश्री विमा योजना, जयप्रकाश नारायण अन्न गॅरंटी योजना इ.

मानवाच्या गरजाच्या पुर्ततेकरीता कमीत-कमी किती पैसा लागेल त्याच्या सर्व प्रकारच्या हालचाली करण्यासाठी किती कॅलरीची गरज भासते हा निकष आर्थिक स्वरुपात मांडुन दारिद्र्य रेषेची कल्पना अर्थशास्त्रात मांडली जाते.

**ग्रामीण विकासात पंचायत राज संस्थांची भुमिका :**

आपल्या देशात लोकशाही विकेंद्रीकरणाची सुरुवात प्रक्रिया लार्ड रिपनच्या इ.स.1882 च्या कायद्याने झाली. स्वातंत्र्यापुर्वी काळात ब्रिटीशांनी मर्यादित अशी सत्ता व अधिकार स्थानिक संस्थांना दिले.

परंतु स्वातंत्र्यानंतर भारताची भुमिका वेगळ्या स्वरुपाची होती. सरकार सत्ता जनतेच्या हातात देऊ इच्छीत होते. त्यामुळे देशात लोकशाहीचा पाया मजबुत होणार. 1952 साली पहिली पाच वार्षीक योजना सामुदायिक विकास व राष्ट्रीय विस्तार कार्यक्रम सुरु झाला. या योजनानंतर आढावा घेण्यासाठी बलवंतराव मेहता समिती 1959 साली स्थापन करण्यात आली. त्यांनी अहवाल दिला. राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम गावपातळीवर यशस्वीपणे राबवायचे असेल तर लोकशाही व सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद, तालुका स्तरावर पंचायत समिती आणि ग्राम स्तरावर ग्रामपंचायत संस्था स्थापन करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर प्रतिनिधीच्या जबाबदाऱ्या, अधिकार, शासकीय कर्मचारी भुमिका इ. विषयी माहिती अहवालात मांडण्यात आल्या व तशा राज्याला सुचना करुन आपल्या स्तरावर कार्यवाही करण्याच्या सुचना केल्या.

प्रथम पंचायत राज सुरुवात राजस्थान 1960 आंद्रा नंतर सर्व राज्यांनी शिफारशी मान्य केल्या 1977 अशोक मेहतांनी फक्त जिल्हा परिषद व ग्रामपंचायत सुचविल्या. परंतु प.बंगाल, आंद्रा कर्नाटकने स्वीकार केला.

**महाराष्ट्र पंचायत राज :**

1 मे 1960 महाराष्ट्र वेगळा, 1960 मध्ये वसंतराव नाईक समितीने पंचायतराजचा अभ्यास केला व 1961 ला महाराष्ट्र सरकार अहवाल सादर केला. महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 हा कायदा तयार केला. 1958 चा मुंबई राज्य ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामपंचायत व ग्रामसभा घेण्यात यावी सांगड घालुन पुढे हे विकेंद्रीकरण किंवा त्रिस्तरीय योजनाचा प्रयोग 1 मे 1962 पासुन सुरु केला व आजही सुरु आहे.

**जिल्हा परिषदर रचना :**

१. महाराष्ट्रातील एकुण 36 जिल्हांपैकी 33 ग्रामीण जिल्हा परिषद आहे.
२. लोकसंख्यामागे मतदार संघ निर्माण कल्या जाते. 35000 हजार लोकसंख्यामाग्र एक मतदार संघ 1 प्रतिनिधी.
३. राखीव जागा. लोकसंख्या प्रमाणानुसार SC, ST, OBC जागा राखीव ठेवते.
४. जिल्हा परिषद एकुण सदस्यांपैकी 50% जागा स्त्रियांसाठी राखीव असतात.

५. एकुण जिल्हा परिषदच्या अध्यक्षापैकी 50% अध्यक्षपदे हि महिलांसाठी राखीव पद चक्रार बदलतात.

६. जिल्हा परिषद मुदत 5 वर्षे

७. जिल्हा परिषद सदस्यांमधुन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड

८. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कायद्याने सचिव असतो.

९. वर्षात 4 वेळा सर्वसाधारण सभा गरज भासल्यास विशेष सभा बोलावतात.

१०. कार्याच्या देखरेखेसाठी 10 समित्या असतात.

११. पं.स. सभापती जिल्हा परिषदेचे पदसिध्द सभासद असतात.

१२. 4 संघीय सहकारी संस्था अध्यक्ष हे जिल्हा परिषदचे सहयोगी सभासद असतात.

१३. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचा जिल्हामध्ये राहणारा एक संचालक हा सहयोगी सभाद असतो.

**जिल्हा परिषद समित्या :**

शिक्षण, आरोग्य, बांधकाम, पशुसंवर्धन, महिला व बाल कल्याण, स्थायी समिती, कृषी, जल संधारण, समाज कल्याण समिती.

**पंचायत सिमती रचना :**

तालुका स्तरावर पं.स. ची स्थापना करण्यात आली आहे. साधारण 17500 लोकसंख्यांचा एक मतदार संघ गृहित धरला जातो. लोकसंख्यांच्या प्रमाणात मतदार संघ राखीव जागा ठेवल्या जातात. 50% जागा महिलांसाठी राखीव, पाच वर्षे मुदत, जिल्हाधिकारी किंवा प्रतिनिधीमार्फत निवडणुक घेण्यात येत निवडुन आलेल्या सदस्यामधील सभापती व उपसभापती निवड होते. पं. स. बैठक प्रत्येक महिन्याला होते. गरज भासल्यास विशेष सभा बोलावली जाते.

पंचायत समिती सचिव म्हणुन गट विकास अधिकारी असतात. पंचायत समितीची एक उपसमिती असते. तालुक्यात असणाऱ्या सरपंचापैकी 1/5 सरपंचाची या उपसमितीवर प्रत्येक वर्षी निवड होते. उपसभापती हे या समितीचे पदसिध्द अध्यक्ष असतात. विस्तार अधिकारी समितीचे सचिव म्हणुन काम पाहतात.

**पंचायत समितीचे कामकाज :**

जिल्हा परिषदेची सर्व कामे पंचायत समिती मार्फत केली जातात. त्यात सामान्य प्रशासन, ग्रामपंचायत, समाजकल्याण, शिक्षण, आरोग्य, इमारत, दळणवळण, कृषी, पशुसंवर्धन, छोटे बंधारे, भुजल सर्वेक्षण, महिला बाल कल्याण, अर्थ इ. विभागाचा समावेश असतो. ही कामे पार पाडण्यासाठी विस्तार अधिकारी व इतर कर्मचारी असतात.

**ग्राम पंचायतची कामे :**

सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण व सांस्कृतीक कामे, गावरक्षण, प्रशासकीय कार्य, शेती व जंगल सुधार, राज्य व केंद्रांच्या योजनांविषयी कामे इ.

Research Hub International Journal

**ग्राम पंचायत कर्मचारी :**

प्रशासनासाठी अधिक्षक, लेखनिक, शिपाई, आरोग्यासाठी सफाई कामगार, मुकादम, वाहन चालक,नळ पाणी पुरवठा (प्लॅम्बर, ऑपरेटर इ.), वॉचमेन, दिवाबत्तीसाठी वायरमन आणि शिपाई, बालवाडीसाठी शिक्षीका व सहाय्यक, गस्त व पहाऱ्यासाठी रक्षक, स्वस्त धान्य, खत व किटकनाशक इ. साठी ग्रामपंचायत कर्मचारी नेमु शकतात.

**गट विकास अधिकाऱ्याची भुमिका :**

राज्य लोकसेवा आरोग परिक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीस किंवा तहसीलदार श्रेणीच्या अधिकाऱ्याची नेमणुक सरकारद्वारे गटविकास अधिकारी पदासाठी केली जाते. महसुल खात्यातील व्यक्तीस प्राधान्य दिले जाते. पंचायत समितीच्या प्रशासकीय मुल्य किंवा पंचायत समिती सचिव म्हणुन गट विकास अधिकारी काम पाहतात.

**कार्ये व जबाबदाऱ्या :**

१. पंचायत समिती मार्फत आपल्या क्षेत्रात सर्व कामे अंमलात आणणे.
२. जिल्हा परिषदेच्या अनुदानाने विकास काम घेणे व राबविणे
३. राज्य व केंद्र शासनाच्या आलेल्या योजना राबविणे
४. पंचायत समितीचे अंदाजपत्रक बनविणे
५. ग्रा. पंचायतीच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे
६. विविध विषयाच्या विस्तार अधिकाऱ्यावर देखरेख ठेवणे
७. जिल्हा परिषदेकडुन येणारे पत्रव्यवहार पाहणे
८. ग्रा. पंचायत व जिल्हा परिषद यातील दुवा म्हणुन काम पाहणे
९. पं. समिती कर्मचाऱ्यावर नियंत्रण ठेवणे
१०. पं. समितीने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी
११. जनसंपर्कात राहुन त्यांच्या विकासासाठी कार्य करणे
१२. सभापतीच्या सल्याने बैठका, बोलावणे व कामकाज नोंदी ठेवणे. बैठकित चर्चेचा अधिकार आहे. परंतु मतदानाचा मात्र अधिकार नाही.
१३. पंचायत समितीचे आदेश त्यांच्या सहि शिक्यांनी होतात.
१४. पं. समितीचा अर्थसंकल्प बनविणे तसेच अर्थसंकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर तरतुदीप्रमाणे रक्कम विविध खात्यांच्या योजनेवर खर्च करणे.

गटविकास अधिकारी व लोकप्रतिनिधी यात सुसंवाद असेल तर विकास कामे जलद होतात.

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची भुमिका व कार्ये :**

जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांची यंत्रणा महाराष्ट्र सरकारच्या ग्रामविकास खात्याकडे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी या यंत्रणेतील मुख्य कार्यकारी अधिकारी हे पद प्रमुख असुन ते भारतीय प्रशासन सेवेतुन भरले जाते.

Research Hub International Journal

जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत यांच्या विकासाची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर आहे. त्यांची नियुक्ती राज्य सरकार करते ते त्यांच्या कामासाठी राज्य सरकारला जबाबदार असतात.

१. अंमलात आलेल्या अधिकारांचा वापर करणे
२. सर्व अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कामे ठरवुन देणे
३. जिल्हा परिषदच्या विषय समितीत तसेच पंचायत समितीच्या सभेत हजर राहण्याचा अधिकार आहे.
४. जिल्हा परिषदच्या वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्याची नेमणुकीचा अधिकार
५. सर्व कामाच्या अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे
६. कामाची अंमलबजावणी करणे
७. जिल्हा परिषदेच्या सभेची व कामकाजाची सर्व कागदपत्रे व दस्तावेज आपल्या अधिकारात ठेवणे
८. जिल्हा निधीतुन रक्कम काढणे व त्याचे सवितरण करणे
९. सर्व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे
१०. जिल्हा परिषदेच्या आर्थिकविषयक काम मंजुरी न दिल्यास ते राज्यशासनाकडे पाठविणे
११. राज्यशासनाने वेळोवेळी सोपविलेली कर्तव्य पार पाडणे.

आपल्या खात्याच्या योजना तयार करणे. आपल्या खात्यासंबंधीत कामे करणे. योजनांना मंजुरी देणे. कामाची पाहणी करणे. सर्वेक्षण करणे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, आरोग्य व बांधकाम, कृषी, पाटबंधारे, महिला व बाल कल्याण या सर्व घटकाच्या विकासासाठी काम करणे.

**73 वी घटना दुरुस्ती :**

गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ग्रामपंचायती स्थापन करण्यात यावे असे भारतीय घटनेतील 40 व्या कलमात सुचविलेले आहे व घटनेने ही जबाबदारी राज्य सरकारवर टाकलेली आहे. ग्रामपंचायती स्वायत्त संस्था म्हणुन स्वतंत्र्यरीत्या कार्य करु शकतील इतक्या त्या बळकट कराव्यात असेही घटनेत सुचविले आहे. परंतु राज्य सरकार आपले अधिकार कमी करुन ते पंचायती राज व्यवस्थेकडे सोपविण्यास तयार नव्हते व त्यामुळे ग्रामविकास कार्यास पाहिजे त्या प्रमाणात वेग नव्हता. त्यासाठी राजीव गांधी यांनी पंचायत राज अधिक बळकट करण्यासाठी घटनेत दुरुस्ती करण्यासाठी विधेयक लोकसभेत मांडले व आवश्यक ते कायदे करण्यात सांगीतले. त्यात एकुण 79 प्रकारची ग्रामविकासाची महत्वपुर्ण कार्य करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीला देण्यात आलेली आहे. जेणेकरुन गावाचा विकास होईल व गावाच्या माध्यमाने देशाचा विकास होईल.

**73 व्या घटना दुरुस्तीचे वैशिष्ट्ये :**

१. संपुर्ण भारतात पंचायतराज व्यवस्थेबाबत एकसुत्रता
२. वर्तमान व्यवस्थेत कायदेशीर दर्जा
३. पाच वर्षांनी निवडणुक बंधनकारक
४. ग्रामपंचायत बरखास्त झाल्यास सहा महिन्याच्या आत निवडणुक घेणे
५. ग्रामपंचायतीने वर्षातुन 4 ग्रामसभा घेणे बंधनकारक

Research Hub International Journal

६. सर्व वर्गवारीतील लोकांच्या आरक्षणाकरीता रोटेशन पध्दती

७. एक तृतीयांश जागा महिलासाठी राखीव

८. सरपंच पदाकरीता रोटेशन पध्दती

९. पंचायत संस्थेचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी वित्त आयोगांच्या स्थापनेची तरतुद

१०. आर्थिक विकास व सा. न्याय योजनाची अंमलबजावणी काम ग्रा. पंचायतेकडे

**घटना दुरुस्ती पुर्वी :**

१. ग्रा. प. निवडणुका शासकीय यंत्रणेमार्फत घेतल्या जात होत्या.

२. ग्रा. पं. मध्ये कायद्याने महिला व मागासवर्गीय आरक्षण नव्हते.

३. महिला व मागासवर्गीय आरक्षण निश्चित नव्हते.

४. सर्व कारभार सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवकाकडे एकवटला होता.

५. ग्रामसभा घेणे कायद्याने बंधनकारक नसल्यामुळे ग्रामसभा होत नव्हत्या.

६. ग्रामपंचायतचा कार्यकाल कायद्याने निश्चित केलेला नव्हता.

**घटना दुरुस्ती नंतर :**

१. स्वतंत्र निवडणुक आयोगामार्फत निवडणुका घेण्यात येत आहेत.

२. कायद्यामुळे 1/3 जागेसाठी महिलांना आरक्षण मिळाले.

३. सरपंच पदासाठी रोटेशन पध्दत सुरु झाली

४. मागासवर्गीय ग्रामपंचायत मध्ये कायद्याने प्रतिनिधीत्वाच्या संधी प्राप्त झाल्यात

५. वर्षातुन किमान दोन वेळा गावात ग्रामसभा घेणे अनिवार्य झाले

६. निवडणुक कार्यकाल कायद्याने निश्चित करण्यात आला

७. ग्रामपंचायत बरखास्त झाल्यास सहा महिन्याच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक झाल्या परंतु उर्वरीत कालखंड सहा महिन्यापेक्षा कमी असेल तर या मुदतीसाठी निवडणुक घेण्याची आवश्यकता नाही.

**संदर्भ :**


- "ग्रामसभा : प्रभावी शासन प्रशासनासाठी" , नितीन आरोटे, गाथा कॉगनिशन, अहमदनगर
- "पंचायतराज : ग्रामीण विकास आणि सरपंच", डॉ. विष्णू गुंजाळ, अथर्व प्रकाशन, जळगाव
- "ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या", आनंद यादव, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे
- "समुदाय संघटन : समाजकार्य पध्दत", डॉ. दिलीप घोंगडे, अथर्व प्रकाशन, जळगाव


Research Hub International Journal